MHBI080010982022

# नियमीत दिवाणी दावा क्र.२८१/२०२२ मधील नि.क्र. ४८ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–३९ नियम –७ प्रमाणे व कलम–१५१ अन्वये न्यायालयीन आयुक्तांच्या नेमणुकीसाठी दिलेला आहे. वादींनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की सदरचा दावा त्यांनी प्रतिवादींविरूद्ध प्रतिवादी क्र.१ ने दिलेला निकाल रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींनी सदरचे दाव्यासोबत नि.क्र.५ वर तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने संचिका क्र. २०२१/जमा–२/कावि–१४३ मध्ये ता. १७.०५.२०२२ रोजी मौजे पुरुषोत्तमपुरी शिवारातील सर्व्हे क्र.१०/गट क्र.१७ च्या पूर्व बाजूने ८.५० फुटाचा रस्ता देण्याचा व वादी व इतर शेतकऱ्यांविरूद्ध प्रतिबंधीत आदेश जारी केला आहे.

२. वादी क्र.१ ची मौजे पुरुषोत्तमपुरी शिवारात सर्व्हे क्र.१० मध्ये वडीलोपार्जीत शेत जमीन आहे. सदर स.क्र.१० चा गट क्र.१७ झाला असू
न त्याचे एकूण क्षेत्रफळ १० हेक्टर ६४ आर, पोट खराब ०.२० आर आहे. वादी क्र.१ चे वडील उत्तमराव आप्पाराव धिरडे यांनी अंदाजे ३५ वर्षांपूर्वी स.क्र.९/गट क्र.१६ मधील ४ एकर ३० गुंठे जमीन खरेदी केली की जी आजपर्यंत वादी क्र.१ च्या कुटुंबियांच्या मालकी व ताब्यात अखंडीतपणे आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ चे वडील बाबासाहेब व प्रतिवादी क्र.४ व ५ हे सख्खे भाऊ असून त्यांची स.क्र.११ मध्ये १५ एकर शेतजमीन होती. सदर स.क्र.११ चे पुढे गट क्र.१८, १९ व २० असे झाले व प्रत्येक गटाचे क्षेत्रफळ प्रत्येकी ५ एकर असे झाले. प्रतिवादी क्र.५ ने गट क्र.१५ मध्ये ४ एकर ३० गुंठे जमीन घेतली आहे की जी वादी क्र.१ च्या कुटुंबियांच्या गट क्र.१६ च्या पश्चिमेस आहे.

३. प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचा वडीलोपार्जीत असलेला स.क्र.११ हा वादी क्र.१ च्या कुटुंबाच्या स.क्र.१० च्या उत्तरेस आहे. सदर स.क्र.११ मध्ये जाण्या–येण्यासाठी

वादी क्र.१ च्या असलेल्या गट क्र. १५ व १६ च्या बांधावरुन दक्षिणेकडून उत्तरेकडे जाऊन पुढे काही अंतरावर पूर्णपणे वादीच्या असलेल्या गट क्र. १६ च्या बांधावरुन स.क्र.११ (गट क्र.१८, १९ व २०) मध्ये जाण्या–येण्यासाठी वहितीसाठी १० ते १२ फुटाचा रस्ता ७० ते ८० वर्षांपासून होता व आजही आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ चे गट क्र.२० मधील शेत हे वादीच्या गट क्र.१७ पेक्षा १० ते १५ फुट खाली आहे. वादी क्र.२ ची जमीन वादी क्र.१ च्या जमीनीच्या खाली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या आदेशामध्ये नमूद असलेला रस्ता करणे शक्य होत नाही. सदर बाब पंचनाम्यामध्ये जाणीवपूर्वक वगळली आहे. त्यामुळे जायमोक्यावरील खरी परिस्थीती या न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे.

४. प्रतिवादी क्र. २ ने त्याची आई सौ. विमल बाबासाहेब सोळंके हिच्या नावे गट क्र. २४ मधील ०.२० हे. आर जमीन खरेदीखत क्र. १४९/२०१८ अन्वये खरेदी केली आहे. सदर खरेदीखतामध्ये प्रतिवादी क्र.२ ची जमीन पश्चिम बाजूला दर्शविली आहे. प्रतिवादी क्र.२ ची गट क्र. २० व २२ मध्ये जमीन असून या जमिनीमध्ये जाण्या–येण्यासाठी गट क्र. २४ मधून दक्षिण बाजूने पूर्व – पश्चिम रस्ता राहील असे याच खरेदीखतामध्ये नमूद केले आहे. यावरुन स्पष्ट होते की प्रतिवादी क्र.२ याला जाण्या–येण्यासाठी पूर्वापार रस्त्याव्यतिरीक्त गट क्र.२४ मधून देखील रस्ता उपलब्ध आहे. परंतु सदर बाब प्रतिवादी क्र.२ याने अद्यापपर्यंत तहसीलदार, मंडळ अधिकारी व न्यायालय यांच्यापासून लपवून ठेवली आहे. प्रतिवादींना त्यांच्या शेत जमिनीत जाण्यासाठी पूर्वापार रस्ता आहे. केवळ शेतजमिनीचे नुकसान करण्याच्या हेतूने व वादींना त्रास देण्यासाठी प्रतिवादींनी नविन रस्त्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदरचे प्रकरणाची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी शेवटी अशी विनंती केली आहे की प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना मौजे पुरुषोत्तमपुरी शिवारातील गट क्र.१८, १९, २० मध्ये असलेल्या त्याच्या शेतजमीनीत जाण्या–येण्यासाठी वादी क्र.१ च्या गट क्र.१५ व १६ च्या शेतजमीनीच्या बांधावरुन असलेल्या १० – १२ फुटाच्या दक्षिणोत्तर पूर्वापार रस्त्याची पाहणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी. तसेच प्रतिवादी क्र.२ याला त्याच्या शेतजमिनीत

जाण्या–येण्यासाठी पूर्वापार रस्त्याव्यतिरीक्त गट क्र.२४ मध्ये उपलब्ध असलेल्या ०.२० हे. आर क्षेत्राची त्यांनी पाहणी करावी. तसेच मौजे पुरुषोत्तमपुरी, ता. माजलगाव येथील गट क्र. २० व २२ मध्ये असलेल्या प्रतिवादी क्र.२ च्या शेतजमीनीत जाण्या–येण्यासाठी उपलब्ध असलेले सर्व रस्ते प्रत्यक्ष नकाशामध्ये दाखवून नकाशा व पंचनामा यासह वस्तुस्थितीप्रमाणे अहवाल न्यायालयात दाखल करावा. शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र.१ ने नि.क्र.५२ वर जबाब दिला असून त्यांनी त्यात कथन केले आहे की, वादींचा अर्ज कायदेशीर व खरा नाही. वादींनी सदरचे दाव्यात विलंब करण्यासाठी सदरचा खोटा अर्ज दिलेला आहे. मौजे पुरुषोत्तमपुरी शिवारातील जुना स.नं. व नविन गट नंबरच्या शासकीय नकाशावर रस्ता असल्याचे दिसून येत नाही. यावरुन प्रतिवादी क.२ व ३ यांना त्यांचे गट क्र.२० मध्ये जाण्या–येण्यासाठी रस्ता नसल्याचे स्पष्ट होत आहे. गट क्र.२० व २४ च्या मध्ये गट क्र.२१ मधील जमीन असून गट क्र.२० व २४ हे लगत नाहीत. त्यामुळे तहसीलदार माजलगाव यांनी दिलेल्या निकालाशी गट क्र.२४ मधील जमीनीचा काहीही संबंध येत नाही. प्रतिवादी क्र.२ ने गट क्र.२० मधील जमिनीमध्ये ऊस पिकाची लागवड केलेली आहे. मागील वर्षी वादींनी ऊस गाळपास जाण्यास अडथळा निर्माण केलेला आहे त्यामुळे गाळपाअभावी ऊस तसाच उभा आहे. त्यामुळे प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होत आहे. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ ने सदरच्या अर्जास नि.क्र.५३ वर जबाब दिलेला असून त्याने प्रतिवादी क्र.१ च्या जबाबाची पुनरावृत्ती केलेली आहे.

६. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्यांवर मी माझे कारणांसह खालील निष्कर्ष नोंदवीत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे आवश्यक आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u>**

७. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री. डक व प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. मस्कर व प्रतिवादी क्र.२ तर्फे विद्वान वकील श्री. कुरे यांचा युक्तिवाद ऐकला. वादींचे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, त्यांचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज प्रलंबीत आहे. प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचा वडीलोपार्जीत असलेला स.क्र.११ हा वादी क्र.१ च्या कुटुंबाच्या स.क्र.१० च्या उत्तरेस आहे. सदर स.क्र.११ मध्ये जाण्या–येण्यासाठी वादी क्र.१ च्या असलेल्या गट क्र.१५ व १६ च्या बांधावरुन दक्षिणेकडून उत्तरेकडे जाऊन पुढे काही अंतरावर पूर्णपणे वादीच्या असलेल्या गट क्र.१६ च्या बांधावरुन स.क्र.११ (गट क्र. १८,१९ व २०) मध्ये जाण्या–येण्यासाठी वहितीसाठी १० ते १२ फुटाचा रस्ता ७० ते ८० वर्षापासून होता व आजही आहे. तसेच, प्रतिवादी क्र.२ व ३ चे गट क्र.२० मधील शेत हे वादीच्या गट क्र.१७ पेक्षा १०–१५ फुट खाली आहे. तसेच वादी क्र.२ ची जमीन वादी क्र.१ च्या जमिनीच्या खाली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या आदेशामध्ये नमूद असलेला रस्ता करणे शक्य होत नाही. सदर बाब पंचनाम्यामध्ये जाणीवपूर्वक वगळली आहे.

८. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.२ ने त्याची आई सौ. विमल बाबासाहेब सोळंके यांच्या नावे गट क्र.२४ मधील ०.२० हे. आर. जमीन खरेदी केली आहे. सदरची जमीन पश्चिम बाजूला आहे. सदर खरेदीखतामध्ये प्रतिवादी क्र.२ ची गट क्र. २० व २२ मध्ये जमीन असून या जमिनीमध्ये जाण्या–येण्यासाठी गट क्र. २४ मधून दक्षिण बाजूने पूर्व–पश्चिम रस्ता राहील असे खरेदीखतामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ला जाण्या–येण्यासाठी पूर्वापार रस्त्या व्यतिरीक्त गट क्र.२४ मधून देखील रस्ता उपलब्ध आहे. परंतु सदरची बाब प्रतिवादी क्र.२ ने लपवून ठेवली आहे. त्यामुळे सदरच्या रस्त्यांची खरी परिस्थीती न्यायालयासमोर येण्यासाठी अर्जात नमूद केल्याप्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यात यावी व अहवाल मागविण्यात यावा.

९. याउलट प्रतिवादी क्र.१ च्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादींनी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ ला दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. वादींनी कथन केलेला रस्ता पुरुषोत्तमपुरी शिवारातील जुने सर्वे नंबर व नवीन गट नंबरच्या शासकीय

नकाशावर दिसून येत नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांचे गट नंबर २० मध्ये जाण्या–येण्यासाठी रस्ता नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्याची आवश्यकता नाही. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ चे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादींनी कथन केलेला पर्यायी रस्ता उपलब्ध नाही. वादी हे सदरच्या दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी वेगवेगळे अर्ज देत आहेत. महणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

१०. वादींनी सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–३९ नियम–७ अन्वये दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–३९ नियम–७ (१)(अ) अन्वये एखाद्या दाव्यातील विषय वस्तू असलेली किंवा त्या दाव्यात जिच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित होईल अशी कोणतीही मालमत्ता अटकावून ठेवणे, तिचे जतन किंवा पाहणी करणे इत्यादीसाठी न्यायालय आदेश देऊ शकते. सदरच्या दाव्यातील वादींचे व प्रतिवादींचे कथन पाहता प्रतिवादी क्र.२ व ३ यांना त्यांच्या वर नमूद केलेल्या शेत मिळकतीत जाण्या–येण्यासाठी असणाऱ्या उपलब्ध रस्त्यांची प्रत्यक्ष परिस्थीती काय आहे, हे न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे पक्षकारांतील वादांचा विचार करता माझे मते न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करणे हे तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढण्यासाठी मदतीचे होईल. वादींनी प्रतिवादींना पर्यायी उपलब्ध असलेल्या रस्त्यांची पूर्ण माहिती अभिलेखावर आणण्यासाठी व सदरच्या रस्त्यांचे निरीक्षण करण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादींचा सदरचा अर्ज हा पुरावा गोळा करण्यासाठी दिलेला नाही. सदरचे दाव्यातील वादी व प्रतिवादींची कथने पाहता सदरच्या पर्यायी उपलब्ध रस्त्यांची परिस्थीती काय आहे, हे न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांतील वादाचा विचार करता माझ्या मते न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करणे हे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे व त्यामुळे मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादींचा नि.४८ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्त म्हणून ॲड. एस. सी. शर्मा यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्यांनी मौजे पुरुषोत्तमपुरी, ता. माजलगाव, जि. बीड येथील प्रतिवादी क्र.२ ते ५ यांना गट क्र.१८, १९ व २० मध्ये असलेल्या त्यांच्या शेतजमिनीत जाण्या–येण्यासाठी वादी क्र.१ च्या गट क्र.१५ व १६ च्या शेतजमिनीच्या बांधावरुन १० ते १२ फुटाचा दक्षिण–उत्तर पूर्वापार रस्ता आहे किंवा कसे व प्रतिवादी क्र.२ ला त्याच्या शेतजमिनीत जाण्या–येण्यासाठी पूर्वापार रस्त्याव्यतिरीक्त गट क्र.२४ मधून दक्षिण बाजूने पूर्व–पश्चिम रस्ता उपलब्ध आहे किंवा कसे व गट क्र. २० व २२ मध्ये असलेल्या प्रतिवादी क्र.२ च्या शेत जमिनीत जाण्या–येण्यासाठी उपलब्ध असलेले इतर सर्व रस्ते नकाशामध्ये प्रत्यक्ष दाखवून त्या सर्व बाबींचा नकाशा व स्पष्ट अहवाल सदरचे न्यायालयात सादर करावा.

३. वादींनी न्यायालयीन आयुक्तांची फी रु.१०,०००/– ही ता.२०.०१.२०२३ रोजी किंवा त्या पूर्वी न्यायालयात जमा करावी.

४. सदरची वर नमूद केलेली रक्कम न्यायालयात जमा केल्यानंतर न्यायालयीन आयुक्तांना त्यांच्या नियुक्तीबाबतचे पत्र देण्यात यावे. त्यानंतर न्यायालयीन आयुक्तांनी दोन्ही पक्षांना नोटीसा काढाव्यात.

५. वादी व प्रतिवादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत त्यांना आयुक्तांच्या नोटीसा मिळाल्यानंतर त्यात नमूद केलेल्या दिवशी व वेळेला सदरच्या स्थळावर हजर रहावे. जरी कोणताही पक्षकार किंवा त्यांचे वकील त्यावेळेला गैरहजर असतील तरीही न्यायालयीन आयुक्तांनी त्यांच्या अहवालाचे काम त्यांचे गैरहजेरीत करावे. न्यायालयीन आयुक्तांना निशाणी क्रमांक १, ४८ व नि.क्र.४८ वरील आदेशाची प्रत अवलोकनासाठी देण्यात यावी.

६. न्यायालयीन आयुक्तांनी त्यांचा अहवाल सदरचे न्यायालयात ता. २०.०२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावा.

७. सदरचे न्यायालयीन आयुक्तांचा अहवाल हा सदरच्या प्रकरणात दाखल करण्यात आल्यानंतर तो शाबीत झाल्याशिवाय पुराव्यात वाचण्यात येणार नाही

Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2023.01.10 13:55:14 +0530

(सो. द. घनवट)

दि. १०/०१/२०२३. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १०/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १०/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १०/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १०/०१/२०२३ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – १०/०१/२०२३

(ह. ब. सूर्यवंशी)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव